महाराष्ट्र शासन

# बृहन्मुंबईतील दवाखान्यांतील नोकऱ्यांसाठी असलेल्या किमान वेतन समितीचा

# अहवाल

(जून १९७६)


अध्यक्ष : श्री. एस. एस. दिघे
(मुंबई)

सदस्य सचिव : श्री. पी. के. परांजपे
(मुंबई)



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय

[किमत—५० पैसे]

# बृहन्मुंबईतील दवाखान्यांतील नोकऱ्यांसाठी असलेल्या किमान वेतन समितीचा

# अहवाल

( जून १९७६ )

## अनुक्रमणिका


| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| | शिफारशींचा सारांश | |
| क्रमांक १ | प्रस्तावना, समितीची रचना–तिचे विचारार्थ विषय .. .. | १ |
| क्रमांक २ | समितीच्या कामाची प्रगती .. .. .. | ३ |
| क्रमांक ३ | माहिती गोळा करणे आणि तिचे विश्लेषण .. .. | ६ |
| क्रमांक ४ | किमान वेतन (आमचा दृष्टिकोन) .. .. | ९ |
| क्रमांक ५ | मालक व कामगार यांचे दृष्टिकोन .. .. | १२ |
| क्रमांक ६ | शिफारशी .. .. .. | १६ |
| क्रमांक ७ | ऋणनिर्देश .. .. | १९ |
| जोडपत्रे | | |
| अ | अधिसूचना, दिनांक १२ जून १९७४ (समितीची नेमणूक) .. | २० |
| ब | कामगारांची विभागणी (व्यवसायनिहाय वेतनें) .. | २२ |
| क | कामाचे तास इत्यादीसंबंधीची माहिती .. .. | २३ |

## शिफारशींचा सारांश

१. **कामगारांचा संवर्ग.**—बृहन्मुंबईतील दवाखान्यामधील कामगारांकरिता किमान वेतनांची शिफारस करण्यात आली आहे. (टीप—किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या अनुसूचीच्या भाग एक-मधील नोंद क्रमांक ४० खाली व्याख्या केल्याप्रमाणे दवाखाने).

(१) मिश्रक, (२) व्रणोपचारक, (३) परिचर, (४) लिपिक, (५) परिचारिका, (६) क्ष-किरण नोकर, (७) मोटार-चालक, (८) दूरध्वनि यंत्रचालक-नि-स्वागतकार.

वरील संवर्गांखाली येणाऱ्या व्यक्तींकडून जे काम करण्यात येते त्या कामासारखे काम करणारे कर्मचारी, मग त्यांना कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो, यात समाविष्ट आहेत:—

२. **किमान वेतन.**—किमान वेतनाची शिफारस खालील प्रमाणे आहे:—

| संवर्ग | | रुपये. |
|---|---|---|
| (१) मिश्रक | (एक) | ३२५ दरमहा |
| (तिन उप गट) | (दोन) | २५० दरमहा |
| | (तीन) | २०० दरमहा |
| (२) व्रणोपचारक | | २४० दरमहा |
| (३) परिचर | | २४० दरमहा |
| (४) लिपिक | | २५० दरमहा |
| (५) परिचारिका | (एक) | ३७५ दरमहा |
| (चार उप-गट) | (दोन) | ३३० दरमहा |
| | (तीन) | ३०० दरमहा |
| | (चार) | २७० दरमहा |
| (६) क्ष-किरण नोकर | | २४० दरमहा |
| (७) मोटार चालक | | ३२५ दरमहा |
| (८) दूरध्वनि यंत्रचालक-नि-स्वागतकार | | २७० दरमहा |

३. **विशेष भत्ता.**—ग्राहक मूल्य निर्देशांक (मुंबई केंद्र-नवीन मालिका) २९० पेक्षा जास्त झाल्यास ती वाढ निष्प्रभ करण्यासाठी २९० वरील प्रत्येक दोन अंशांच्या वाढीकरिता दरमहा रुपये १·५० प्रमाणे विशेष भत्याची शिफारस करण्यात आली आहे. याची परिगणना सहा महिन्यांच्या सरासरीच्या आधारावर करावयाची आहे.

४. **अंशकालिक कर्मचारी.**—दिवसातून फक्त चारच तास काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ते करीत असतील त्या कामाच्या स्वरूपानुसार ते ज्या संवर्गाचे असतील त्या संवर्गाला देय असलेल्या किमान वेतनाच्या ६० टक्के वेतनाची शिफारस केली आहे.

५. **प्रशिक्षण घेत असलेले मिश्रक.**—अर्हताप्राप्त नसलेल्या मिश्रकांकरिता (शेवटचा गट) निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या ८० टक्के.

**किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या अनुसूचीतील नोंद ६ किंवा २३ खाली येणाऱ्या कोणत्याही रुग्णालयातील दवाखाने नसलेल्या बृहन्मुंबईतील दवाखान्यामधील नोकऱ्यात किमान वेतन दर निश्चित करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल.**

## प्रकरण १

### प्रस्तावना

१.१. **समितीची रचना.**—महाराष्ट्र शासन, उद्योग व कामगार विभागाने किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या अनुसूचीतील नोंद ६ किंवा २३ येणाऱ्या कोणत्याही रुग्णालयातील दवाखाने नसलेल्या बृहन्मुंबईतील कोणत्याही दवाखान्यातील नोकऱ्यांतील विद्यमान परिस्थितींची चौकशी करण्यासाठी व उक्त नोकऱ्यांतील किमान वेतन दर निश्चित करण्याच्या संबंधात शासनाला सल्ला देण्यासाठी एका समितीची नियुक्ती केली आहे. किमान वेतन अधिनियमाचे कलम ५, पोट-कलम (१) च्या खंड (ए) अनुसार काढण्यात आलेला शासन निर्णय, उद्योग व कामगार विभाग क्र. एमडब्लूए,५८७३/१५४३५०/एलएबी-तीन-ए, दिनांक १२ जून १९७४ द्वारे महाराष्ट्र शासनाने या समितीची नेमणूक केली आहे. प्रस्तुत शासन निर्णय या अहवालाच्या जोडपत्र 'अ' मध्ये उधृत केला आहे.

१.२. **समितीचे सदस्य.**—या समितीवर पुढील व्यक्तींची नेमणूक करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एस. एस. दिघे, विधानसभा सदस्य. | अध्यक्ष |
| २. | डॉ. सुधाकर एच. देशपांडे मानद सह सचिव, भारतीय वैद्यक संघ (मुंबई शाखा) | सदस्य (मालकाचे प्रतिनिधी) |
| ३. | श्री. पी. आर. केळुस्कर, प्रधान सचिव, मिश्रक-औषध निर्माता कर्मचारी संघ, मुंबई. | सदस्य (कर्मचाऱ्याचे प्रतिनिधी) |

श्री. पी. एस. नेरुरकर, सहायक कामगार आयुक्त, मुंबई यांची, त्यांच्या स्वतःच्या कामाबरोबरच या समितीचे सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

नंतर, शासन निर्णय, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक एमडब्लूए./५८७४/१०००५२/एलएबी-तीन-ए,दिनांक ३० जानेवारी १९७५ द्वारे पुढील जादा सदस्यांची समितीवर नियुक्ती करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. आर.एन. सवनीस, अध्यक्ष. नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन, (मुंबई शाखा). | सदस्य (मालकांचे प्रतिनिधी) |
| २. | श्री. एस्. एम. धारप, उपाध्यक्ष, मिश्रक व औषधनिर्माता कर्मचारी संघ,मुंबई. | सदस्य, (कामगारांचे प्रतिनिधी) |

सचिवाच्या पदधारकातही बदल झाले. श्री. पी. एस्. नेरूरकर (सचिव) हे राज्य परिवहन महामंडळात प्रतिनियुक्तीवर गेल्यामुळे श्री. एम. डी. नाईक यांची सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली. (दि. २९ नोव्हेंबर १९७५ चा शासन निर्णय) परंतु, श्री. एम. डी. नाईक यांची किराणा जिन्नस व माल परिवहन मंडळाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाल्या कारणाने श्री. एम. डी. नाईक यांच्या जागी श्री. पी. के. परांजपे, यांची नियुक्ती करण्यात आली, (शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. एमडब्ल्यूए. ५८७३/६३-एलएबी–सात, दिनांक २७ जानेवारी १९७६).

१.३. समिती पुढील विचारार्थ विषय हे वर निर्दिष्ट केलेल्या दिनांक १२ जन. १९७४ च्या शासन निर्णयात दिलेले आहेत.

"उक्त अधिनियमाच्या अनुसूचीतील नोंदी ६ किंवा २३ खाली येणाऱ्या कोणत्याही रुग्णालयातील दवाखाना नसलेल्या, बृहन्मुंबईतील कोणत्याही दवाखान्यातील नोकऱ्यांत असलेल्या विद्यमान परिस्थितीची चौकशी करण्यासाठी व उक्त नोकऱ्यांतील किमान वेतन दर निश्चित करण्याच्या संबंधात शासनाला सल्ला देण्यासाठी,"

१.४, **शासनाला अहवाल सादर करण्यासाठी मुदतीची मर्यादा.**—समितीला आपला अहवाल शासनाला वरील शासन निर्णयाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत म्हणजे १२ डिसेंबर १९७४ पूर्वी सादर करावयाचा होता, तथापि, समितीच्या विनंतीवरुन, समितीला आपला अहवाल सादर करण्यास शासनाने मुदतवाढ दिली. समितीने आपला अहवाल १२ जुलै १९७६ रोजी म्हणजे वाढवून दिलेल्या मुदतीत सादर केला.

* * *

## प्रकरण २

### समितीच्या कामाची प्रगती

२.१. समितीला, तिच्याकडे सोपविण्यात आलेले काम पूर्ण करणे शक्य व्हावे म्हणून समितीकडे बृहन्मुंबईतील दवाखान्यांत कामावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण सेवा-शर्तीसंबंधीची आधारभूत माहिती असणे जरुर होते. सर्वसाधारणपणे प्रस्थापित कार्यपद्धती-नुसार, प्रश्नावली मध्ये उल्लेख केलेल्या मुद्यांवर आवश्यक ती माहिती मिळविण्यासाठी संबंधित व्यक्तीमध्ये एक प्रश्नावली फिरविण्यात येते. तथापि, या सेवेशी निगडित असलेल्या संस्था आणि संबंधित व्यक्ती यांची संख्या फार मोठी असल्यामुळे तसेच अशा समित्यांकडून काढण्यात आलेल्या प्रश्नावलीस यापूर्वी मिळालेला प्रतिसाद फारसा उत्साहवर्धक नव्हता ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन समितीने 'नमुना सर्वेक्षणाच्या' तत्त्वावर बृहन्मुंबईच्या वेगवेगळ्या भागातील वैद्यक व्यवसायींशी संपर्क साधण्याकरिता कामगार आयुक्तांच्या कार्यालयातील कामगार अन्वेषकांची प्रतिनियुक्ती करण्याचे ठरविले. म्हणजे, वैद्यक व्यवसायी आणि त्यांचे कर्मचारी यांच्याकडून समितीला आवश्यक माहिती मिळू शकेल. समितीने या गोष्टीची नोंद घेतली की, स्थूलमानाने या रोजगारातील कर्मचारी सामावून घेणारी मिश्रक व औषध-निर्माता कर्मचारी संघ ही एकमेव मान्यताप्राप्त संघटना आहे. समितीने आपल्या विचार-विमर्शांच्या वेळी या संघटनेचा दृष्टिकोन स्वतंत्रपणे ऐकला. या मुद्याची या अहवालाच्या या पुढील एका प्रकरणात नोंद करण्यात आली आहे.

### समितीच्या कामास दिलेली प्रसिद्धी

२.२. समितीने स्थानिक वृत्तपत्रांमध्ये इतर गोष्टींवरच खालील मुद्यावर समितीकडे आपले विचार/सूचना/प्रस्ताव/आक्षेप इ. सादर करण्यासाठी संबंधित व्यक्तींचे लक्ष वेधून घेणारे प्रसिद्धी पत्रक काढण्याची व्यवस्था केली. ते मुद्दे असे.—

(१) निरनिराळ्या वर्गातील कर्मचाऱ्यांसाठी ज्या मर्यादेपर्यंत वेतनाचे किमान दर निश्चित करता येतील ती मर्यादा.

(२) वेतनाच्या किमान दराची राहणीमानाच्या खर्चाशी सांगड घालणे इष्ट आहे किंवा नाही.

(३) सध्या अस्तित्वात असलेल्या सेवेच्या शर्ती.

(४) कर्मचाऱ्यांना गणवेष, निवारा, वैद्यकीय सहाय्य इ. रुपाने सध्या पुरवण्यात येणाऱ्या सोयी.

(५) कर्मचाऱ्यांच्या वर्गीकरणाबाबत सूचना.

(६) या रोजगारातील कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्तीसंबंधी अस्तित्वात असलेले निवाडे, समझोते, करार इत्यादींच्या प्रती सादर करणे.

हे प्रसिद्धीपत्रक बृहन्मुंबईतील प्रमुख वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाले असे समितीच्या लक्षात आले. समितीच्या विनंतीनुसार भारतीय वैद्यकीय संघ मुंबई शाखा यांच्या माननीय सचिवांनी आपल्या 'बिमा' नावाच्या मासिक बुलेटिनमध्ये समितीच्या कामाकडे वैद्यक व्यवसायींचे लक्ष वेधून घेणारी आणि समितीपुढे आपली निवेदने सादर करण्याची त्यांना विनंती करणारी

एक टिप्पणी प्रसिद्ध केली. ही टिप्पणी 'बिमा' या बुलेटिनच्या सप्टेंबर १९७४ च्या अंकामध्ये प्रसिद्ध झाली. मुंबई येथील बॉम्बे हॉस्पिटलकडून प्रकाशित होणाऱ्या 'बॉम्बे हॉस्पिटल कॅलेंडर' च्या संपादकास देखील तशीच विनंती करण्यात आली होती आणि संपादकांनी नोव्हेंबर १९७४ च्या कॅलेंडरमध्ये योग्य ती टिप्पणी प्रकाशित करून आमच्या विनंतीचा मान राखला.

२.३. **तोंडी साक्षीची नोंद.**—वृत्तपत्रातील प्रसिद्धीपत्रक आणि 'बिमा' व बॉम्बे हॉस्पिटल कॅलेंडरमध्ये प्रकाशित झालेल्या टिप्पण्यांना मिळालेला प्रतिसाद फारसा उत्साहवर्धक नव्हता त्यामुळे समितीला त्यांचे मुद्दे कळण्यासाठी खालील संस्थांना या विषयावरील त्यांची निवेदने सादर करण्यास आवर्जून सांगण्यात आले.

(ए) वैद्यक व्यवसायींचे प्रतिनिधी

१. इंडियन मेडिकल असोसिएशन, मुंबई शाखा.

२. इंडियन मेडिकल असोसिएशन, मुलुंड शाखा.

३. इंडियन मेडिकल असोसिएशन, नॉर्थ-ईस्ट, मुंबई उपनगर शाखा.

४. इंडियन मेडिकल असोसिएशन, बॉम्बे वेस्ट उपनगर शाखा.

५. नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन, मुंबई.

६. जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन.

७. बॉम्बे 'ई' वॉर्ड मेडिकल असोसिएशन.

८. इन्शुरन्स मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन.

(बी) कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी

१. मिश्रक व औषधनिर्माते कर्मचारी संघ, मुंबई.

२. बृहन्मुंबई परिचारिका संघ, मुंबई,

वैद्यक व्यवसायींच्या संघाला प्रपत्रांच्या प्रती पुरविण्यात आल्या व या प्रपत्रात उल्लेखिलेल्या मुद्यांवर समितीला आधारभूत माहिती गोळा करावयाची होती. संघाच्या सदस्यांकडून वैयक्तिक माहिती मिळविण्यासाठी संघाला ही प्रपत्रे पुरविण्यात आली होती.

२.४. **साक्ष नोंदणीकरिता सत्रे.**—ज्या संस्था तोंडी साक्ष देण्यासाठी स्वेच्छेने पुढे आल्या त्यांनी दिलेल्या तोंडी साक्षींची नोंद करण्याकरिता समितीने वेगवेगळया तारखेस खास सत्रे भरविली होती. व त्यांमध्ये पुढे तपशीलवार दर्शविल्याप्रमाणे अशा प्रकारची नोंद घेण्यात आली.

| अनु-क्रमांक १ | संस्थेचे नाव २ | साक्ष नोंदविल्याची तारीख ३ |
|---|---|---|
| १ | इंडियन मेडिकल असोसिएशन, नॉर्थ-,ईस्ट मुंबई उपनगर शाखा | ..६ नोव्हेंबर १९७४ |
| २ | इंडियन मेडिकल असोसिएशन, मुंबई शाखा .. | ..११ नोव्हेंबर १९७४ |
| ३ | मुंबई 'ई' वॉर्ड मेडिकल असोसिएशन .. | ..३ जानेवारी १९७५ |
| ४ | नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन, मुंबई शाखा | ..१७ जानेवारी १९७५ |
| ५ | जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन .. | ..३० जानेवारी १९७५ |
| ६ | इन्शुरन्स मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन .. | .. ५ फेब्रुवारी १९७५ |
| ७ | मिश्रक व औषधनिर्माता कर्मचारी संघ, मुंबई. .. | .. ७ एप्रिल १९७५ |

खास सत्राच्या ठिकाणी असलेली वरील संस्थांच्या सदस्यांची उपस्थिती ही साधारणपणे समाधानकारक होती. आणि सदस्यांनी चर्चेत व विचार विनिमयात सक्रिय भाग घेतला.

२.५. समितीने वेळोवेळी अनेक बैठकी घेतल्या आणि अशा बैठकींकरिता निश्चित केलेल्या कार्यसूचीवरील विविध बाबींवर चर्चा केली. या बैठकीमध्ये समितीने घेतलेले निर्णय हे एकमताने घेतलेले होते हे नमूद करण्यास समितीला आनंद वाटतो. वस्तुतः ज्यांना ३० जानेवारी १९७५ रोजी म्हणजे समिती स्थापन झाल्यानंतर जवळजवळ महा महिन्यांनी समितीवर अतिरिक्त सदस्य म्हणून नेमण्यात आले होते त्या डॉ. आर. एन. सबनीस व श्री. एस. एम. धारप यांनी सुद्धा समितीने त्यांच्या नेमणुकीपूर्वी घेतलेल्या निर्णयांना पुष्टी देण्यास प्रतिकूलता दर्शविली नाही.

* * *

# प्रकरण ३

## माहिती गोळा करणे आणि तिचे विश्लेषण

३.१. या रोजगारातील विद्यमान परिस्थितीशी हे प्रकरण संबंधित आहे.

३.२. या रोजगारातील कर्मचाऱ्यांच्या कामाच्या शर्तीसंबंधातील माहिती कामगार आयुक्तांच्या कार्यालयातील कामगार अन्वेषकांना प्रतिनियुक्त करून मिळवण्यात आली या गोष्टीचा यापूर्वी प्रकरण दोनमध्ये उल्लेख केलेलाच आहे. बृहन्मुंबईच्या निरनिराळ्या भागात काम करणारे वैद्यक व्यवसायी व त्यांचे कर्मचारी यांच्याकडून विहित नमुन्यात माहिती गोळा करावी असे त्यांना सांगण्यात आले होते. वैद्यक व्यवसायाची निवड ही नमुनावजा होती. त्यांच्या पाहणीच्या क्रमामध्ये त्यांनी एकूण ३६६ दवाखान्यांना भेटी दिल्या. कामगार अन्वेषकांनी दवाखान्यांना दिलेल्या भेटींचे विश्लेषण खाली दिलेल्या तक्ता एकमध्ये दाखविले आहे :—

**तक्ता एक**

| | | |
|---|---|---|
| (१) | मुलाखतीकरिता उपलब्ध न झालेले डॉक्टर | ६० |
| (२) | बंद आढळलेले दवाखाने | ७३ |
| (३) | अतिशय गर्दी | ८८ |
| (४) | जागा बदललेले | १ |
| (५) | कर्मचारी नसलेले | २३ |
| (६) | माहिती देण्यास नकार दिलेले | १० |
| (७) | नमुने घेतले पण सादर केले नाहीत | १३ |
| (८) | गोळा केलेल्या नमुन्यांची संख्या | ९८ |
| | एकूण | ३६६ |

त्याशिवाय, वैद्यक व्यवसायींच्या संघांना नमुन्याच्या जादा प्रती पुरवण्यात आल्या होत्या व त्या आपापल्या सदस्यांकडून भरून घ्याव्या अशी त्यांना विनंती करण्यात आली होती. अशा नमुन्यांना प्रत्यक्षात अजिबात प्रतिसाद मिळाला नाही, हे नमूद करण्यास समितीस विषाद वाटतो.

३.३ कामगार अन्वेषकांनी भेट दिलेल्या अनेक दवाखान्यांपैकी बरेचसे दवाखाने त्यांनी भेट दिली त्यावेळी बंद असलेले आढळले किंवा तेथे वैद्यक व्यवसायी काही इतर कामात होते आणि त्यामुळे त्या दवाखान्यांतून अन्वेषकांना आवश्यक ती माहिती मिळू शकली नाही किंवा अन्यथा आवश्यक माहिती मिळवणे त्यांना अशक्य झाले. या सर्व सत्य परिस्थितीमुळे कामगार अन्वेषकांच्या कार्यावर विपरीत परिणाम झाला. तथापि, वैद्यक व्यवसायींकडून अन्वेषकांना जी माहिती मिळू शकली नव्हती ती सर्व तपशीलासह वैद्यक व्यवसायींच्या विविध संघांच्या प्रतिनिधींना तसेच मिश्रक आणि औषधनिर्माते कर्मचारी संघाने समितीपुढे आपल्या निवेदनाद्वारे मांडली होती.

३.४. कामगार अन्वेषकांनी मिळविलेल्या माहितीचे विविध सेवा आणि कामाच्या शर्ती असलेल्या निरनिराळ्या तक्त्यांमध्ये पुढीलप्रमाणे विश्लेपण केले आहे.

३.५. **कर्मचाऱ्यांची संख्या—व्यवसायानुसार.**—बृहन्मुंबईतील वैद्यक व्यवसायी आणि त्यांनी सेवेत ठेवलेले कर्मचारी यासंबंधीची अचूक माहिती मिळविणे समितीला शक्य झाले नाही. तथापि, उपलब्ध माहितीनुसार बृहन्मुंबईतील वैद्यकविषयक निरनिराळ्या पद्धतींचा अवलंब करून व्यवसाय करत असलेल्या वैद्यक व्यवसायींची संख्या सुमारे ८,००० च्या जवळपास असावी असा अंदाज आहे. होमिओपॅथी आणि युनानी वैद्यक पद्धतीचा अवलंब करणाऱ्या वैद्यक व्यवसायींनी कर्मचारी कामावर नेमले आहेत असेवैद्यक क्वचितच आढळले. अॅलोपॅथी पद्धतीने व्यवसाय करणाऱ्या वैद्यकव्यवसायींच्या बाबतीत विशेषत: ज्या वैद्यक व्यवसायींनी निदान ४ ते ५ वर्षांपेक्षा जास्त व्यवसाय केला होता त्यांनी मिश्रक इत्यादींना नोकरीत ठेवले असल्याचे प्रमाण लक्षणीय असल्याचे आढळले.

कामगार अन्वेषकांनी ज्यांच्याशी संपर्क साधला होता त्या वैद्यकव्यवसायींनी व्यवसायानुसार नोकरीत ठेवलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या तक्ता क्रमांक २ मध्ये दर्शविली आहे :—

**तक्ता दोन**

| अनु-क्रमांक | व्यवसाय | कर्मचाऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | मिश्रक (अर्हताप्राप्त) | ८ |
| २ | मिश्रक (इतर) | ९८ |
| ३ | लिपिक | ९ |
| ४ | सहायक | १२ |
| ५ | परिचर | १२ |
| ६ | व्रणोपचारक | ४ |
| ७ | डॉक्टर (कर्मचारी) | २ |
| ८ | विक्रेता (युनानी) | २ |
| ९ | मजूर | २ |
| १० | आया | १ |
| ११ | सफाईगार | २६ |

दवाखान्यांमधील मोठ्या प्रमाणावरील कर्मचारी हे मिश्रक परिचर आणि सहायक या व्यवसायातच आहेत हे वरील तक्त्यावरून दिसून येईल. सफाईगारांसंबंधी असे दिसून आले की, त्यांची अंशकालिक तत्वावर नेमणूक करण्यात आली होती.

३.६. **विद्यमान वेतनाचे स्वरूप.**—या अहवालाच्या जोडपत्र 'ब' मध्ये दवाखान्यातील कर्मचाऱ्यांची वेतनानुसार आणि व्यवसायानुसार विभागणी दिली आहे. या नोकरीतील मुख्य संवर्ग जो मिश्रकांचा आहे त्यांच्या विविध वैद्यक पद्धतीत मिळणाऱ्या किमान व कमाल वित्तलब्धींचे विश्लेपण खालीलप्रमाणे आढळले :—

तक्ता तीन

| | | किमान रुपये | कमाल रुपये |
|---|---|---|---|
| १. | मिश्रण (ॲलोपॅथी पद्धती) .. .. | ४० | ३७५ |
| २. | मिश्रक (आयुर्वेदिक आणि होमिओपॅथी पद्धती) .. | ५० | १५० |
| ३. | मिश्रक-नि-विक्रेता (युनानी) .. .. | २०० | २०० |

या कर्मचाऱ्यांना निराळा असा महागाई भत्ता मिळत नव्हता. त्यांना मिळणारी वित्तलब्धी एकत्रित वेतन म्हणूनच समजण्यात येते.

३.७. **कामाचे तास.**—कामगार अन्वेषकांनी पाहणी केलेल्या दवाखान्यांतील कामाच्या तासासंबंधीची माहिती या अहवालाच्या जोडपत्र 'क'मध्ये दिली आहे. उक्त माहितीच्या आणि समितीपुढे सादर केलेल्या निवेदनांच्या आधारे कर्मचाऱ्यांचे कामाचे तास दिवसाला आठ तासांपेक्षा अधिक होत नाहीत असा निष्कर्ष काढता येतो.

३.८. वैद्यक व्यवसायींकडून साप्ताहिक सुट्या, नैमित्तिक रजा, आजारपणाची रजा, अर्जित रजा, प्रसूति रजा, पगारी सुटी आणि गणवेश पुरवणे इत्यादींसंबंधीची माहिती गोळा करण्याचा देखील प्रयत्न करण्यात आला. या निरनिराळ्या प्रकारच्या रजांची संख्या व त्या देण्याची पद्धती यासंबंधी कोणतीही ठराविक पद्धती नाही असे दिसून आले. निरनिराळ्या वैद्यक व्यवसायींकडील रजांची संख्या व त्या देण्याची पद्धती वेगवेगळी असल्याचे आढळून आले. या कर्मचाऱ्यांना वर्षातून साधारणपणे १५ दिवस ते १ महिन्याची रजा देण्यात येते व अशा प्रकारे मंजूर केलेल्या रजेच्या कालावधीचे वेतनही देण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. नैमित्तिक रजा हक्क म्हणून देण्याची पद्धती कोठेच आढळली नाही. वैद्यकीय व्यवसायींकडून कोणत्याही कर्मचाऱ्याची अल्प कालावधीची नैमित्तिक गैरहजेरी ही पगारी किंवा बिनपगारी रजा म्हणून मानण्यात येते. कोणत्याही पगारी सुट्या किंवा राष्ट्रीय उत्सवाच्या सुट्या साधारणपणे देण्यात येत नाहीत. वैद्यकीय व्यवसायींनी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना आठवड्यातून एक वेळा म्हणजे सधारणपणे रविवारी जेव्हा दवाखाना अर्ध्या दिवसाकरिता बंद असतो तेव्हा अर्ध्या दिवसाची सुटी देण्यात येते.

दवाखान्यातील कर्मचाऱ्यांना पोषाख देण्याची पद्धती फारशी प्रचारात नाही. मात्र काही वैद्यकीय व्यवसायी आपले मिश्रक व परिचर यांना पोषाख देतात.

या कर्मचाऱ्यांना वृद्धापकाळातील लाभांच्या दृष्टीने भविष्यनिर्वाह निधीची कोणतीही पद्धती नाही असे दिसून आले. काही वैद्यकीय व्यवसायींनी आपल्या कर्मचाऱ्यांच्या नावाने आयुर्विमापत्रे घेतली असून ते त्यांच्या वतीने विम्याचा हप्ता भरतात. परंतु अशी उदाहरणे अगदी तुरळक असल्याचे सांगण्यात आले. सेवेतून निवृत्त होताना कर्मचाऱ्यांना उपदान देण्याची कोणतीही नियमित पद्धति अस्तित्वात नाही. वैद्यक व्यवसायी आणि कर्मचारी यांच्यामधील संबंध जेवढा घनिष्ट असेल त्याच्या आधारे वैद्यक व्यवसायींकडून कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान म्हणून काही रक्कम दिली गेल्याची काही एकट दुकट प्रकरण कळविण्यात आली आहेत. दिवाळीच्या किंवा महत्त्वाच्या धार्मिक सणाच्या वेळी वैद्यक व्यवसायींकडून कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदानाच्या रूपाने काही रक्कम दिली जाते. ह्या रकमा कोणत्याही सूत्राच्या आधारे न देता तदर्थ तत्त्वावर देण्यात येतात व प्रत्यक्ष रकमासुद्धा वेगवेगळ्या असतात.

* * *

# प्रकरण ४

## किमान वेतन

### (आमचा दृष्टिकोन)

गेल्या पंचवीस वर्षांत निरनिराळ्या रोजगारात कायद्याने किमान वेतन निश्चित करण्यात आले आहे. किमान वेतन निश्चित करणे हा कल्याणभिमुख वेतनविषयक धोरणाचाच पुढचा टप्पा आहे. व कामगारांना 'आर्थिक-नि-सामाजिक' संरक्षण देणे हा त्यामागील उद्देश आहे.

४.१. [illegible] या पातळ्या निश्चित केल्या आहेत. त्याम्हणजे निर्वाह वेतन, रास्त वेतन व किमान वेतन या होत. समितीने निर्वाह वेतनाच्या संबंधात पुढीलप्रमाणे प्रतिपादन केले आहे. निर्वाह वेतन म्हणजे असे राहणीमान की जे केवळ शारीरिक अस्तित्वापुरतेच नसून आरोग्य व उत्तम राहणी टिकवण्याच्या दृष्टीने उपयुक्त असेल. यात व्यक्तीला आपल्या मुलांचे शिक्षण, आजारपणापासून संरक्षण, अत्यावश्यक अशा सामाजिक गरजा व अधिक महत्त्वाच्या अशा दैवी आपत्तींविरूद्ध थोडीबहुत तरतूद यांसारख्या थोड्याशा सुखसोयी यांचाही अंतर्भाव होतो. किमान वेतन हे जेमतेम जगण्यापुरतेच असू नये तर त्याद्वारे शिक्षण, वैद्यकीय गरजा व सुखसोयी यांची थोड्याफार प्रमाणात तरतूद होऊन कामगारांच्या कार्यक्षमतेचे रक्षण होण्याची खात्री झाली पाहिजे. रास्त वेतनाची निम्नमर्यादा ही किमान वेतन असेल तर त्याची कमाल मर्यादा ही उद्योगाच्या वेतन देण्याच्या क्षमतेवर अवलंबून असेल, असे यात गृहीत धरण्यात आले आहे.

असे दिसून आले आहे की, राष्ट्रीय उत्पन्नाच्या जवळ जवळ कोणत्याही पातळीवर समाजाला जे देणे परवडेल अशा किमान वेतनाची एक ठराविक पातळी असलीच पाहिजे. "समाजाला जे देणे परवडण्यासारखे नसेल अशा पातळीवर किमान वेतन निश्चित करण्यात आले तर त्यामुळे नोकऱ्या कमी प्रमाणात उपलब्ध होतील व त्यायोगे राष्ट्रीय उत्पन्नातही घट होईल. (रास्त वेतनावरील समितीचा अहवाल. पृष्ठ ३.)

किमान वेतन, रास्त वेतन व निर्वाह वेतनाच्या ह्या पातळ्यांद्वारे कोणतीही स्थिर व ताठर कल्पना व्यक्त होत नाही. आर्थिक विकास व सामाजिक न्याय या गोष्टींनुसार त्यांत बदल आणि वाढ होणारच आहे.

४.२. पुढे १५ व्या भारतीय श्रमिक परिषदेत गरजेनुरूप किमान वेतन म्हणून किमान वेतनाचा विचार केला. त्यात इतर कोणत्याच गोष्टींचा विचार न करता किमान मानवी गरजा भागवण्याची खात्री असली पाहिजे. गरजेनुरूप किमान वेतनात कोणकोणत्या गोष्टी येतात त्याची प्रत्यक्ष यादीच त्या परिषदेने तयार केली. किमान वेतन निश्चित करणाऱ्या मंडळांच्या मार्गदर्शनासाठी त्या परिषदेने पुढील कसोट्या विहित केल्या आहेत.—

(एक) किमान वेतनाची गणना करताना प्रमाण कामगार कुटुंब म्हणजे एका मिळवत्या व्यक्तीमागे तिच्यावर अवलंबून असणाऱ्या तीन व्यक्ती असतात असे मानले पाहिजे यात स्त्रिया, मुले व किशोर व्यक्ती यांचे उत्पन्न विचारात घेतले जाऊ नये.

(दोन) माफक काम करणाऱ्या साधारण प्रौढांसाठी डॉ. आयक्राईड (Aykroid) यांनी शिफारस केल्याप्रमाणे अन्नापासून त्याला २,७०० कॅलरीज मिळतील या आधारावर अन्न-विषयक किमान गरजांची गणना करण्यात यावी.

(शा.म.मु.) आरए ४६८६–३ (५७९–२-७८)

(तीन) दर वर्षी दर माणशी १८ वार कापड या आधारे वस्त्रासंबंधातील गरजांची गणना करण्यात यावी. त्यानुसार सर्वसामान्य कामगाराच्या ४ व्यक्तींच्या कुटुंबासाठी एकूण ७२ वार कापड लागेल.

(चार) निवासविषयक सोयींच्या बाबतीत अल्प उत्पन्न गटासाठी अर्थसहाय्यित औद्योगिक गृहनिर्माण योजनेखाली तरतूद करण्यात आलेल्या कोणत्याही क्षेत्रातील घरांसाठी शासनाकडून आकारण्यात येणारे किमान भाडे हे प्रमाण म्हणून समजण्यात यावे.

(पाच) इंधन, दिवाबत्ती व इतर संकीर्ण बाबींवरील खर्च हा एकूण किमान वेतनाच्या २० टक्के येतो असे समजावे.

निश्चित केलेले किमान वेतन हे जेथे जेथे शिफारस केलेल्या वेतन पातळीपेक्षा खाली असेल तेथे तेथे वेतन निश्चित करणाऱ्या मंडळाने ज्या परिस्थितीत विहित प्रमाणग्रहण करणे शक्य झाले नाही. त्या परिस्थितीबाबत समर्थन प्रस्तुत केले पाहिजे.

४.३. मालकाची वेतन देण्याची क्षमता विचारात घ्यावी किंवा घेऊ नये याबाबत वाद उपस्थित झाला. राष्ट्रीय श्रमिक संघटनेने या वादाच्या वेगवेगळ्या बाजूंवर विचार केला व थोडक्यात पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले.—

"गरजेनुरूप किमान वेतन हे रास्त वेतनाच्याच पातळीचे आहे व सध्या कित्येक उद्योगात मिळणाऱ्या किमान वेतनाच्या पातळीपेक्षा किंचित अधिक पातळीवरचे आहे. असे असले तरी वस्तुत: ते रास्त वेतनाच्या खालच्या टप्प्याचेच असते. म्हणून गरजेनुरूप किमान वेतन निश्चित करताना किमान वेतन देण्याची उद्योगाची क्षमता विचारात घ्यावी असे आमचे मत आहे.

गरजेनुरुप किमान वेतन व रास्त वेतनाची वरची पातळी ही मालकाची वेतन देण्याची क्षमता लक्षात घेऊन सोईस्करपणे व टप्याटप्याने आणता येईल. व तशी ती आणावी. किमान वेतन निश्चित करणाऱ्या प्राधिकरणांनी ही एक फलवादी प्रक्रिया आहे ही गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

[ राष्ट्रीय श्रमिक आयोगाचा अहवाल, १९६९ (पृष्ठे २३८) ]

४.४. महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या मानक समितीने न्यायाधिकरणांनी दिलेल्या निवाड्यांचा अभ्यास केला व १५ व्या भारतीय कामगार परिषदेने योजल्याप्रमाणे गरजेनुरूप किमान वेतन मंजूर करण्याची आपली असमर्थता औद्योगिक न्यायाधिकरणांनीदेखील सर्वसाधारणपणे व्यक्त केली असल्याचे त्या समितीला आढळून आले.

(मानक समितीचा अहवाल, परि.४.३४ पृष्ठे २८).

किमान वेतन निश्चित करण्याबाबतच्या प्रश्नासह विकसनशील अर्थव्यवस्थेच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेने एका तज्ज्ञ समितीची नियुक्ती केली होती. त्या समितीने किमान वेतन निश्चित करणाऱ्या मंडळांनी पुढील कसोट्या लक्षात घ्याव्या असे म्हटले आहे.—

(१) कामगारांच्या गरजा, (२) मालकांची वेतन देण्याची क्षमता, (३) देशात इतरत्र मिळणारे वेतन किंवा प्राप्ती (४) विकासविषयक गरजा.

४.५. आमच्या समितीने राष्ट्रीयश्रमिक आयोग व आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेच्या तज्ज्ञ समितीने सुचविलेल्या कसोटयांच्या धर्तीवर ह्या प्रश्नाचा विचार केला. कामगाराच्या किमान वाजवी गरजा, मालकाची वेतन देण्याची क्षमता, विभागातील तुल्य प्रवर्गासाठी असलेली कायदेशीर वेतन पातळी व विकसनशील अर्थव्यवस्थेत अनुसरावयाची तत्त्वे उदा. " स्थैर्य व सामाजिक न्यायासहित विकास—" यांचाही किमान वेतन पद्धती निश्चित करताना विचार करण्यात आला. नोंदलेल्या साक्षींचाही अभ्यास करण्यात आला व मालक संघांनी तसेच कामगार संघांनी व्यक्त केलेल्या मुद्यांना योग्य महत्त्व देण्यात आले.

दवाखान्यांतील नोकऱ्यांसाठी प्रथमच किमान वेतन निश्चित करताना आम्ही सुचवलेली पद्धत ही नजीकच्या भविष्यकाळात " रास्त वेतना " संबंधीच्या पुढील प्रगतीसाठी एक भक्कम आधार म्हणून उपयुक्त ठरेल अशी आम्हाला आशा व विश्वास वाटतो.

* * *

## प्रकरण ५

### मालक व कामगार यांचे दृष्टिकोन

साक्ष नोंदण्यासाठी आमच्या समितीने बैठकी भरवल्या. त्यामध्ये मालक संघ आणि कर्मचारी संघ यांना किमान वेतन निश्चिती संबंधातील त्यांचे दृष्टिकोन मांडण्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते. मुंबईत निरनिराळ्या दिवशी भरलेल्या साक्ष-नोंदणी बैठकांत खालील संघटनांनी भाग घेतला होता :—

(१) इंडियन मेडिकल असोसिएशन—उत्तर-पूर्व मुंबई शाखा;
(२) इंडियन मेडिकल असोसिएशन—मुंबई शाखा;
(३) नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन, मुंबई;
(४) इंडियन मेडिकल असोसिएशन—जी वॉर्ड शाखा;
(५) जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन, मुंबई;
(६) इन्शुरन्स मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन, मुंबई;
(७) कंपाऊंडर्स अॅन्ड फार्मासिस्ट कर्मचारी संघ, मुंबई.

**५.१. कायदेशीर किमान वेतन आवश्यक आहे का?**—कायदेशीर किमान वेतन निश्चितीच्या स्वरूपात शासनाने कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप केला तर त्यामुळे या नोकरीतील सलोख्याचे संबंध विघडतील असे मत काही प्रतिनिधींनी व्यक्त केले. कामाचे तास सेवाकाल आणि अतिकालिक काम या संबंधातील ताठर नियमांमुळे संबंधात तणाव येईल अशी धास्ती व्यक्त करण्यात आली. या व्यवसायाद्वारे समाजाची सेवा केली जात असल्याने त्यामध्ये कामाच्या तासांबद्दलची कोणतीही बंधने नसावीत. निरनिराळ्या प्रकारच्या कायदेशीर नोंदवह्या आणि अभिलेख ठेवण्याचे काम अनेक डॉक्टरांना अडचणीचे वाटते. कारण त्यांना असे काम करण्यास सवडच नसते. किमान वेतन निश्चित केल्याचा परिणाम असा होईल की, औषध मिश्रणे तयार करण्याचे काम औषधविक्रेत्यांच्या दुकानांकडे दिले जाईल व त्यामुळे पुष्कळसे मिश्रक बेकार होतील अशी धास्ती काही जणांना वाटते.

किमान वेतन अधिनियम या उद्योगास लागू करण्यास काही जण विरोध करीत होते तर ज्यांच्या नोकरीची व कामाची स्थिती समाधानकारक नाही अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत " न्याय्य व्यवहार " आवश्यक असल्याबाबत काही लोकांचा आग्रह होता. कामाचे पुरेसे पारिश्रमिक देण्याबरोबरच ज्यायोगे राहणीखर्चातील वाढीचा प्रभाव कमी होईल अशा प्रकारे त्यांना अतिरिक्त महागाई भत्ता मिळण्याची तरतूद व्हावी असेही त्यांना वाटत होते. एका प्रतिनिधीने असे सुचविले की, जर वेतने निश्चित केली तर त्यांच्या अंमलबजावणीचे काम इंडियन मेडिकल असोसिएशनच्या निवड मंडळावर सोपवावे आणि त्या वैद्यक व्यवसायींकडून किमान वेतनाची अंमलबजावणी करून घेण्याचा कायदेशीर अधिकार त्या असोसिएशनला देण्यात यावा.

दुसरीकडे कामगारांच्या प्रतिनिधींनी आपले म्हणणे एकमताने मांडले ते असे की, कायदेशीर किमान वेतन निश्चिती आवश्यक असून तसे ते केले नाहीतर कर्मचाऱ्यांच्या कामाच्या सध्याच्या शर्ती आणि वेतन यामध्ये कधीच सुधारणा होणार नाही.

**५.२. कायदेशीर किमान वेतन मर्यादित स्वरूपात लागू करणे.**—विशेषज्ञ व सल्लागार यांच्याकडून चालविण्यात येणारे दवाखाने व चिकित्सालये यांमध्ये नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यां-करिता कायदेशीर किमान वेतन निश्चित करावे या गोष्टीशी काही मालक सहमत आहेत.

तथापि त्यांना असे वाटते की, आयकर भरण्यास पात्र असलेल्या डॉक्टरानांच किमान वेतन देण्यासाठी पात्र ठरवावे. विमा वैद्यक व्यवसायींच्या प्रतिनिधींनी असे सुचविले की, कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढींची विमा व्यवसायी म्हणून नोंद झालेल्या डॉक्टरांना विमा महामंडळाकडून दर रुग्णामागे देण्यात येणाऱ्या फीमधील वाढीशी सांगड घालावी. काहींनी सुचवले की, फक्त कुशल मिश्रकांकरिताच वेतन निश्चित करावे आणि इतर वर्गांना कायदेशीर किमान वेतनाच्या कक्षेत आणू नये.

कामगारांच्या प्रतिनिधींनी अशी इच्छा व्यक्त केली की, दवाखाने वैद्यक सदृश केंद्रे यामध्ये नोकरीला असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सर्वच वर्गांना किमान वेतनाचे संरक्षण मिळवून द्यावे त्यामध्ये समाविष्ट करण्याकरिता प्रतिनिधी संघाने कर्मचाऱ्यांच्या खाली दिल्याप्रमाणे वर्गांची सूची सादर केली आहे.

(१) मिश्रक.—अर्हताप्राप्त आणि अर्हतारहित;

(२) परिचर आणि लिपिक;

(३) कनिष्ठ डॉक्टर;

(४) साह्यकारी प्रसविका;

(५) व्रणोपचारक;

(६) क्ष-किरण नोकर;

(७) आया.

५.३. **किमान वेतन.**—वैद्यक संघाच्या काही प्रतिनिधींनी मिश्रकांकरिता खालील वेतन पातळ्या सुचवल्या :—

| | वेतन श्रेणी |
|---|---|
| (अ) अर्हताप्राप्त | (१) रुपये १३५–५–२००. |
| | (२) रुपये १९५ (सर्व समावेशक). |
| | (३) रुपये २०० ते २२५. |
| (ब) अर्हतारहित परंतु अनुभवी | (एक) रुपये १३५–५–२०० (दोन वर्षांचा अनुभव असलेले). |
| | (दोन) रुपये १५० (शिकाऊ उमेदवार म्हणून दोन वर्षे काम केल्यानंतर). |
| | (तीन) रुपये १२५ (दोन वर्षानंतर). |
| **(क) प्रशिक्षार्थी** .. | (एक) परस्पर संमत वेतन (पहिली दोन वर्षे). |
| | (दोन) रु. १०० (प्रशिक्षणाच्या कालावधीत). |

संघाने प्रश्नावलीला दिलेल्या उत्तरात कामगारांच्या वतीने खालील वेतन पद्धतीची शिफारस केली आहे :—

| संवर्ग | | | | किमान (दरमहा) |
|---|---|---|---|---|
| | | | | रुपये |
| (एक) अकुशल | .. | .. | .. | २५०. |
| (दोन) अर्ध-कुशल-बी | .. | .. | .. | ३३५. |
| (तीन) अर्ध-कुशल-ए | .. | .. | .. | ३५०. |
| (चार) कुशल-बी | .. | .. | .. | ४००. |
| (पाच) कुशल-ए | .. | .. | .. | ४७०. |

वरील प्रवर्गातील कर्मचाऱ्यांचे वितरण खालीलप्रमाणे असले पाहिजे :—

| | |
|---|---|
| (१) अकुशल | .. सफाईगार, आया. |
| (२) अर्धकुशल-बी | .. परिचर, क्ष-किरण, नोकर, व्रणोपचारक. |
| (३) अर्धकुशल-ए | .. बिल वसुलीकार, लिपिक, दूरध्वनी चालक. |
| (४) कुशल-बी | .. प्रसाविका, सहाय्यकारी परिचारिका, मिश्रक (अर्हतारहित) |
| (५) कुशल-ए | .. अर्हताप्राप्त मिश्रक. |

तोंडी साक्ष देण्यास हजर असलेल्या एका कामगाराने खालील वेतन सुचविले :—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | रुपये |
| कुशल मिश्रक | .. | .. | .. | ४२५. |
| अकुशल मिश्रक | .. | .. | .. | ३५०. |
| परिचर | .. | .. | .. | २५०. |
| प्रशिक्षार्थी | .. | .. | .. | ६० टक्के. |

द्रव्यरूप किमान वेतन हे चालू ग्राहक किमत पातळीवर संघाने काढलेले आणि १५ व्या भारतीय कामगार परिषदेने शिफारस केलेल्या सूत्रावर आधारलेले आहे.

५.४. **अतिरिक्त भत्ता (निर्देशांकाशी निगडित).**—वैद्यक संघाच्या काही प्रतिनिधींनी अशी कळकळीची विनंती केली की, कर्मचाऱ्यांना त्यांच्या गरजांनुसार वेतन देण्यात यावे. राहणी खर्चात होणारी वाढ लक्षात घेता ग्राहकोपयोगी मालावर पडणारा चलनवाढीचा ताण निष्प्रभ करण्यासाठी निर्देशांकाशी निगडित असलेला विशेष भत्ता देऊन कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्यात यावे. इतर काही लोकांनी, कायदेशीर किमान वेतन निश्चित करावे परंतु, त्यात कोणत्याही निर्देशांकाशी निगडित असलेल्या कोणत्याही अतिरिक्त भत्त्याची तरतूद असता कामा नये, या गोष्टीवर जास्त भर दिला आहे.

५.५. **प्रशिक्षणाचा कालावधी.**—अर्हताप्राप्त मिश्रकांना जेवढी मागणी आहे तिच्या मानाने त्यांची संख्या अपुरी पडते. या गोष्टीवर वैद्यक व्यवसायींच्या प्रतिनिधींचे एकमत होते. शासनाने मिश्रकांसाठी एक प्रशिक्षण पाठ्यक्रम सुरू करावा. असे त्यांनी सुचविले.

शिकाऊ उमेदवारीच्या कालावधीच्या संबंधात काही लोकांनी असे मत मांडले की, शिकाऊ उमेदवारीसाठी कोणताही विवक्षित कालावधी निश्चित करू नये. काहींनी असे सुचविले की, शिकाऊ उमेदवारीचा किमान कालावधी दोन वर्षे असावा तर इतरांची हा कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक असावा अशी इच्छा व्यक्त केली. एका संघाने असे सुचविले की, दोन वर्षेपर्यंत मिश्रकांना अकुशल मानण्यात यावे व त्यानंतरची दोन वर्षे त्याला अर्धकुशल मानण्यात यावे.

शिकाऊ उमेदवारीच्या कालातील वेतनाच्या संबंधात काहींनी अशी कळकळीची विनंती केली की, त्या वर्गाकरिता किमान वेतन निश्चित करु नये. इतरांनी खालीलप्रमाणे सूचना केल्या :—

| | | |
|---|---|---|
| (१) पहिली दोन वर्षे | .. | .. परस्पर मान्य विद्यावेतन |
| (२) प्रशिक्षण कालावधीत | .. | .. द. म. रुपये १००; |
| (३) प्रशिक्षण कालावधीत | .. | .. हातखर्चासाठी काही पैसे द्यावेत. |

कामगारांच्या प्रतिनिधींनी असे सुचविले की, प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्यांपेक्षा अधिक असू नये. काहींनी प्रशिक्षण कालावधीमध्ये विहित वेतनाच्या ६० टक्के वेतन द्यावे, असा आग्रह धरला.

५.६. **अंशकालिक कर्मचारी.**—मालकवर्गाचे असे म्हणणे होते की, पूर्णकालिक मिश्रक देखील दिवसाला ८ तासांहून कमी वेळ काम करतात. जे कर्मचारी दिवसाला ५ तासांहून कमी वेळ काम करतात, त्यांना अंशकालिक कर्मचारी मानण्यात यावे. एका संघाचे असे मत पडले की, ४ तासांहून कमी वेळचे काम अंशकालिक काम मानण्यात यावे.

कामगार प्रतिनिधींचे असे मत पडले की, जे कर्मचारी ४ तासांहून कमी वेळ काम करतात, त्यांना अंशकालिक कर्मचारी मानण्यात यावे.

**इतर पैलू.**—

(१) कामगारांच्या प्रतिनिधींनी अशी कळकळीची विनंती केली की, भविष्य निर्वाह निधी, उप-दान, विमा यांसारखे लाभ दवाखान्यांत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देखील लागू करण्यात यावेत.

(२) संघाने असे निदर्शनास आणून दिले की, सफाईगार व स्वच्छक हे दिवसाकाठी सुमारे अर्धा तास काम करतात आणि म्हणून, त्यांच्यासाठी कोणतेही किमान वेतन निश्चित करण्याची गरज नाही.

* * *

## प्रकरण ६

## शिफारशी

मेडिकल असोसिएशन्स आणि कामगार संघ यांच्या प्रतिनिधींनी नोंदवलेल्या पुराव्याचा समितीने काळजीपूर्वक विचार केला आहे. न्याय प्राधिकारी, कामगार परिषद यांनी विहित केलेली मार्गदर्शक तत्त्वे आणि आंतरराष्ट्रीय कामगार संघटनांनी केलेल्या शिफारशीसुद्धा समितीने विचारात घेतल्या आहेत. (१) विदर्भ प्रदेश, (२) मराठवाडा प्रदेश, (३) पुणे प्रदेश, (४) बृहन्मुंबईखेरीज करून मुंबई प्रदेश यांच्याकरिता नियुक्त केलेल्या तत्सम समित्यांनी केलेल्या शिफारशींचाही विचार करण्यात आला आहे.

समिती पुढील बाबींच्या संबंधात शिफारशी करीत आहे :

(१) किमान वेतनाच्या कक्षेत आणावयाचे कर्मचाऱ्यांचे प्रवर्ग.

सादर करण्यात आलेले लेखी पुरावे व निवेदने यांची पाहणी केल्यानंतर समितीने कर्मचाऱ्यांच्या केवळ पुढील प्रवर्गांकरिताच किमान वेतनाची शिफारस केली पाहिजे. हे स्पष्ट होते:–

(१) मिश्रक
(२) व्रणोपचारक
(३) परिचर
(४) लिपिक
(५) परिचारिका
(६) क्ष-किरण नोकर
(७) मोटारचालक
(८) दूरध्वनि-चालक-नि-स्वागतकार.

वैद्यक व्यवसायींच्या हाताखालील कनिष्ठ म्हणून काम करणारे डॉक्टर व (२) सफाई-गार हेदेखील आणखी दोन प्रवर्ग आहेत. या प्रवर्गांच्या बाबतीत कोणत्याही किमान वेतन दरांची शिफारस न करण्याचे समितीने ठरविले आहे कारण कनिष्ठ डॉक्टरांच्या बाबतीत वित्तलब्धी परस्पर करार करूनच ठरवणे अधिक बरे होईल असे समितीला वाटते. तसेच सफाईगार हा संपूर्ण दिवसभरात एक तासापेक्षाही कमी वेळ काम करीत असल्याने अंश-कालिक कर्मचारी म्हणूनसुद्धा त्याचे किमान वेतन निश्चित करण्याची समितीला गरज वाटली नाही.

२. किमान वेतन मेडिकल असोसिएशन्सनी विशेषेकरून अर्हताप्राप्त मिश्रकांच्या कमतरतेबाबत सादर केलेली निवेदने विचारात घेतल्यानंतर अर्हता आणि अनुभव यांच्या संदर्भात (१) मिश्रक, आणि (२) परिचारिका या दोन प्रवर्गांचे वर्गीकरण करणे समितीला आवश्यक वाटते.

| प्रवर्ग | किमान वेतन |
|---|---|
| | रुपये |
| (१) मिश्रक— | |
| (अ) मिश्रक : (एक) अर्हताप्राप्त किंवा (दोन) अर्हताप्राप्त नसलेले परंतु मिश्रक म्हणून आठ वर्षांपेक्षा अधिक अनुभव असलेले. .. | ३२५ दर महा |
| (ब) मिश्रक : अर्हताप्राप्त नसलेले परंतु मिश्रक म्हणून दोन ते आठ वर्षांचा अनुभव असलेले. | २५० दर महा. |
| (क) मिश्रक : अर्हताप्राप्त नसलेले परंतु— | |
| (एक) सहा महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केलेले आणि मिश्रक म्हणून दोन वर्षांपेक्षा कमी अनुभव असलेले. | २०० दर महा. |
| (दोन) सहा महिन्यांपेक्षा अधिक नाही इतक्या कालावधीकरिता मिश्रक म्हणून प्रशिक्षण घेत असलेले. | अर्हताप्राप्त नसलेल्या मिश्रक क्र. १ (क) करिता निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या ८० टक्के. |

टीप.—(१) प्रवर्ग क्रमांक १ (एक) मध्ये मोडणाऱ्या व्यक्तींमध्ये नोंदणीकृत औषधनिर्मात्याची पदविका किंवा मिश्रकाचा पाठ्यक्रम किंवा औषधनिर्माण शाळेची पदविका उत्तीर्ण झाल्यासंबंधीचे प्रमाणपत्र धारण करणारा अर्हताप्राप्त मिश्रक किंवा महाराष्ट्र औषधनिर्माता (परिषदेत नोंदणी केलेला औषधनिर्माता) यांचा समावेश होईल. (दोन) अर्हतारहित मिश्रकांच्या बाबतीत अनुभवाचा कालावधी ठरवण्यासाठी ज्या डॉक्टरकडे तो मिश्रक म्हणून काम करीत असेल किंवा काम केले असेल त्या डॉक्टरने दिलेले प्रमाणपत्र पुरेसे समजण्यात येईल.

(२) व्रणोपचारक .. रुपये २४० दर महा.

(३) परिचर* .. रुपये २४० दर महा.

*टीप—ज्या परिचरांना औषधाचे मिश्रण करण्याचे किंवा औषधे हाताळण्याचे कोणतेही काम करण्याची आवश्यकता नसेल अशा परिचरांना परिचरांसाठी शिफारस करण्यात आलेले किमान वेतन लागू होईल. परिचरांसाठी मुख्य कामे पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) डॉक्टरकडून उपचार करून घेण्यास रुग्णाला मदत करणे.

(दोन) रुग्णांना ओळखचिन्हे (टोकन्स) देणे.

(तीन) सर्वसाधारणपणे येणाऱ्या रुग्णांवर लक्ष ठेवणे.

(चार) लिपिक .. .. दर महा रुपये २५०.

लिपिक हा केवळ लेखनविषयक काम करणारा कर्मचारी असेल.

| | | |
|---|---|---|
| (पाच) परिचारिका : अर्हताप्राप्त— | | |
| (अ) परिचर्या या विषयातील पदवीधारक | .. | रु. ३७५ दर महा. |
| (ब) बी.पी.एन.ए.चे प्रमाणपत्र/पदवीकधारक | .. | रु. ३३० दर महा |
| (क) साह्यकारी परिचारिका | .. | रु. ३०० दर महा. |
| अर्हतारहित— | | |
| ज्या कर्मचाऱ्यांस शुश्रूषा करण्याचा थोडाफार अनुभव असेल असा कर्मचारी. | | रु. २७० दर महा. |
| (सहा) क्ष-किरण नोकर .. | .. | रु. २४० दर महा. |
| (सात) मोटारचालक* .. | .. | रु. ३२५ दर महा. |
| (आठ) दूरध्वनीचालक–नि-स्वागतकार- | .. | रु. २७० दर महा. |

***टीप**.—प्रामुख्याने व्यवसायविषयक कामाच्या संबंधात वैद्यक व्यवसायींकडून ज्यास नोकरीवर ठेवण्यात आले असेल असा कर्मचारी.

**अंशकालिक कर्मचारी**.—लेखी पुराव्यावरून तसेच समितीपुढे करण्यात आलेल्या निवेदनावरून हे उघड झाले की, या रोजगारातील बरेचसे कर्मचारी ४,५½ आणि ६ तास काम करतात. चार तासांपर्यंत आणि सतत किंवा कामात खंड ठेवून एकंदर चार तास केलेले काम हे अंशकालिक काम समजण्यात यावे असे समितीस वाटते.

| | |
|---|---|
| चार तास काम करणारे कर्मचारी | पूर्णकालिक कर्मचाऱ्यांच्या तत्सम प्रवर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या वित्तलब्धीच्या ६० टक्के. |

## राहणी खर्चातील वाढीचा प्रभाव नाहीसा करण्यासाठी विशेष भत्याची तरतूद

मुंबई शहराचा (नवीन मालिका) ग्राहकमूल्य निर्देशांक २९० हा मूलभूत मानून वर नमूद केलेली वेतन पद्धती समितीने निश्चित केली. राहणी खर्चातील वाढीचा प्रभाव नाहीसा करण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी विचारात घेऊन समिती पुढील शिफारशी करीत आहे:—

" २९० या मूलभूत निर्देशांकावरील प्रत्येक २ अंशाच्या वाढीस दर महा १.५० रुपये या दराने विशेष भत्ता देय असेल. इतर रोजगारात करण्यात येते त्याप्रमाणे विशेष भत्याच्या दरातील बदल दर सहा महिन्यांनी मोजण्यात यावा. वरील परिच्छेद ६.२ (किमान वेतन) मध्ये देण्यात आलेले वेतनाचे दर हे, ग्राहकमूल्य निर्देशांक २९० या आकड्याच्या (मुंबई केंद्र—नवीन मालिका) संदर्भात आहेत.

जानेवारी ते जून १९७६ च्या अखेरपर्यंतचा सरासरी ग्राहकमूल्य निर्देशांक २९० च्या वर गेला असेल आणि किमान वेतन जून १९७६ नंतर अंमलात येत असेल तर त्या बाबतीत जुलै-डिसेंबर १९७६ या कालावधीत प्रत्येक २ अंकाच्या वाढीस दर महा रुपये १.५० या दराने विशेष भत्ता देय होईल. जानेवारी-जून आणि जुलै-डिसेंबर असा सहा महिन्यांनी विशेष भत्ता काढणे सोयीस्कर असल्यामुळे तो या पद्धतीने काढण्यात यावा.

*5* *

# प्रकरण ७

## ऋणनिर्देश

हा अहवाल हातावेगळा करण्यापूर्वी समिती वैद्यक व्यवसायींच्या आणि कामगारांच्या संघांनी जे बहुमोल सहकार्य दिले त्याबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त करू इच्छिते.

त्याचबरोबर, समितीने केलेल्या विनंतीनुसार शासनाने वेळोवेळी जी मुदतवाढ मंजूर केली त्याबद्दलही समिती शासनाचीही आभारी आहे.

समितीच्या कामास प्रारंभ झाल्यापासून तो ती शिफारशी करीपर्यंतच्या काळापर्यंत श्री. नेरूरकर यांनी त्यांची बदली होईपर्यंत समितीचे सचिव म्हणून जे मौलिक कार्य केले त्याबद्दलही समिती त्यांचा मनापासून गौरव करीत आहे. नंतर श्री. परांजपे यांनी आपल्या पूर्वीच्या सचिवाचे काम झपाट्याने व योग्य त्या पद्धतीने पूर्णत्वास नेल्याबद्दल समिती त्यांचेही आभार मानीत आहे. तसेच कामगार अन्वेषक सर्वश्री ए. ए. खान आणि जे. बी. शहा यांनी अनुसूचीचा प्रचार करून जी काही महत्त्वाची माहिती गोळा केली त्याबद्दल समिती त्यांचा देखील गौरव करीत आहे.

श्री. धारप (कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य) यांना अंतर्गत सुरक्षा अधिनियमाखाली अटक करण्यात आल्याने ते १५ जून १९७६ रोजी समितीच्या भरलेल्या बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत ही गोष्ट या अहवालाचा समारोप करण्यापूर्वी नमूद करणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटते. याच बैठकीत विद्यमान अहवालाला मान्यता देण्यात आली व त्यावर सह्या करण्यात आल्या. शिफारशींच्या बाबतीत असे नमूद करता येईल की सप्टेंबर १९७५ अखेरीपूर्वी भरविण्यात आलेल्या बैठकीतच शिफारशी मान्य करण्यात आल्या होत्या त्यात पुढे कोणताही बदल करण्यात आला नाही. श्री. धारप हे त्या पूर्वीच्या बैठकींना उपस्थित होते व त्यांनी या शिफारशी मान्य केल्या आहेत.

मुंबई,

दिनांक १५ जून १९७६.

सह्या करणारे—

(एस. एस. दिघे)
अध्यक्ष.

मालकांचे प्रतिनिधी

(एक) (सुधाकर एच. देशपांडे)

(दोन) (आर. एन. सवनीस)

कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी

(एक) (पी. आर. केळूस्कर)

(दोन) (एम. एम. धारप)
ठाणे मध्यवर्ती तुरुंग
अभिप्रमाणित सही...........
वरिष्ठ तुरुंगाधिकारी,
ठाणे मध्यवर्ती तुरुंग.

पी. के. परांजपे,
सदस्य सचिव.

**जोडपत्र ' अ '**

बृहन्मुंबईतील दवाखान्यांतील नोकऱ्यांसाठी
किमान वेतन अधिनियम, १९४८
खाली समिति नियुक्त करणे.

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग व कामगार विभाग**

निर्णय क्रमांक एमडब्ल्यूए.५८७३/१५४३५०/एलएबी-तीन-ए, सचिवालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ जून १९७४

शासन निर्णय

किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा ११) याच्या कलम ५ च्या पोट-कलम (१) खालील खंड (अ) अन्वये बृहन्मुंबईतील उक्त अधिनियमाच्या अनुसूचीच्या नोंद ६ किंवा २३ खालील कोणत्याही रुग्णालयातील दवाखाना नसलेल्या कोणत्याही दवाखान्याच्या नोकरीतील चालू परिस्थितीची चौकशी करण्यासाठी आणि उक्त नोकरीतील वेतनाचे किमान दर निश्चित करण्याच्या संबंधात शासनाला सल्ला देण्यासाठी महाराष्ट्र शासन याद्वारे खालील समितीची नियुक्ती करीत आहे :—

अध्यक्ष

श्री. शरद शंकर दिघे,
विधानसभा सदस्य,
६, सहयोग, काशीनाथ धुरू रोड,
दादर, मुंबई ४०० ०२८.

मालकांचे प्रतिनिधी :

डॉ. एस. एच. देशपांडे,
माननीय सह-सचिव, इंडियन मेडिकल असोसिएशन (मुंबई शाखा).
इंडियन मेडिकल असोसिएशनची इमारत, १६, क्लार्क रोड,
हाजी अली पार्क, टपालपेटी क्र. ७९४८,
मुंबई ४०० ०३४.

कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी :

श्री. प्रभाकर रामचंद्र केळुस्कर,
प्रधान सचिव, मिश्रक व औषध निर्माते,
कर्मचारी संघ २५, इब्राहिम मॅन्शन,
डॉ. आंबेडकर रोड, परळ,
मंबई ४०० ०१२.

२. श्री. पी. एस. नेरूरकर, सहायक कामगार आयुक्त, मुंबई यांना त्यांच्या नेहमीच्या कामाबरोबरच समितीचे सचिव म्हणूनही काम पहाण्यास नियुक्त करण्यात यावे.

३. समितीने, या शासन निर्णयाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत यासंबंधात शासनाकडे आपला तपशीलवार अहवाल सादर करावा.

४. विधान मंडळाचे सदस्य असलेल्या अध्यक्षाना शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक टीअरए. १४७०/१३१/अठरा, दिनांक २७ जानेवारी १९७१ अन्वये प्रवासभत्ता व दैनिकभत्ता देण्यात येईल.

(५) समितीच्या स्थानिक सदस्यांना, उक्त समितीच्या बैठकींच्या प्रत्येक दिवसाकरिता ५ रु. मर्यादिपर्यंत प्रत्यक्ष वाहन खर्च काढण्याची मुभा राहील.

(६) समितीच्या बिनसरकारी सदस्यांच्या प्रवास भत्त्यांच्या संबंधात समितीचे सचिव, पी. एस. नेरूरकर हे नियंत्रक प्राधिकारी असतील.

(७) सर्व अधिकारी आणि विभाग यांना, चौकशीच्या प्रयोजनासाठी समितीला जे जे सहाय्य मिळणे आवश्यक असेल ते ते देण्याची विनंती करण्यात येत आहे.

८. हा खर्च "२८७ कामगार व सेवायोजन—ए-कामगार, (बी)-औद्योगिक संबंध, (बी)-चार—चौकशीसाठी विशेष समिती" (मागणी क्रमांक १२३) या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा आणि त्याखाली मंजूर केलेल्या अनुदानांतून तो भागविण्यात यावा.

९. हा निर्णय वित्तविभागाच्या सहमतीने काढण्यात आला त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३२९, एसडी., दिनांक १५ फेब्रुवारी १९७४ पहावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही) एस. डी. मुळे,
महाराष्ट्र शासन.

## जोडपत्र ' ब '

### बृहन्मुंबईतील दवाखान्यामध्ये नोकरीस असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या आधारभूत माहितीचे विश्लेषण दर्शविणारे विवरणपत्र

(एकत्रीकृत वेतने रुपयांमध्ये)

| अनुक्रमांक | व्यवसायानुसार कर्मचाऱ्यांची संख्या | १ ते २५ | २६ ते ५० | ५१ ते ७५ | ७६ ते १०० | १०१ ते १२५ | १२६ ते १५० | १५१ ते १७५ | १७६ ते २०० | २०१ ते २२५ | २२६ ते २५० | २५१ ते २७५ | २७६ ते ३०० | ३०१ ते ३२५ | ३२६ ते ३५० | ३५१ ते ३७५ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मिश्रक (अर्हता प्राप्त) | ... | ... | ... | १ | ... | ... | ... | ३ | १ | १ | ... | ... | ... | १ | १ | ८ |
| २ | मिश्रक (इतर) | ... | २ | ५ | १२ | १७ | १४ | १२ | १३ | ५ | ८ | ४ | ४ | १ | १ | ... | ९८ |
| ३ | लिपिक | ... | १ | ३ | २ | ... | ... | १ | ... | ... | १ | ... | १ | ... | ... | ... | ९ |
| ४ | सहायक | ... | १ | १ | ६ | २ | १ | ... | १ | ... | ... | ... | ... | .. | ... | ... | १२ |
| ५ | परिचर | ... | ३ | २ | ६ | १ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | .. | ... | ... | १२ |
| ६ | व्रणोपचारक | ... | ... | ... | १ | ३ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ४ |
| ७ | डॉक्टर (कर्मचारी) | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | १ | ... | ... | ... | १ | ... | २ |
| ८ | विक्रेता (युनानी) | ... | ... | ... | ... | ... | ... | .. | २ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | २ |
| ९ | मजूर | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | २ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | २ |
| १० | आया | ... | १ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | १ |
| ११ | सफाईगार | २० | ५ | ... | ... | १ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | २६ |

## जोडपत्र ' क '

### बृहन्मुंबईतील दवाखान्यांतील कर्मचाऱ्यांच्या कामाच्या तासांचे विश्लेषण दर्शविणारे विवरणपत्र

| अनुक्रमांक | व्यवसाय | १/२ तास | १ ते २ | २ ते ३ | ३ ते ४ | ४ ते ५ | ५ ते ६ | ६ ते ७ | ७ ते ८ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मिश्रक (अर्हता प्राप्त) .. | ... | १ | ... | ... | ... | ५ | २ | ... | ८ |
| २ | मिश्रक (इतर) .. .. | ... | ... | ४ | ८ | १९ | ४४ | १९ | ४ | ९८ |
| ३ | लिपिक .. .. | १ | ... | ... | ... | १ | ५ | १ | १ | ९ |
| ४ | सहायक .. .. | ... | ... | ... | ... | २ | ६ | ४ | ... | १२ |
| ५ | परिचर .. .. | ... | ... | १ | २ | ८ | १ | ... | ... | १२ |
| ६ | व्रणोपचारक .. .. | ... | ... | ... | १ | ... | ... | २ | १ | ४ |
| ७ | डॉक्टर (कर्मचारी) .. | ... | ... | ... | ... | ... | ... | २ | ... | २ |
| ८ | विक्रेता (युनानी) .. .. | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | २ | २ |
| ९ | मजर .. .. | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | २ | २ |
| १० | आया .. .. | ... | १ | ... | ... | ... | ... | ... | ... | १ |
| ११ | सफाईगार .. .. | २५ | ... | ... | ... | ... | ... | ... | १ | २६ |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई